मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमधील 650 शाळांना महापालिकेची नोटीस

## उन्हाळ्याची सुटी संपून शाळांचा पहिला दिवस सुरू झाला असतानाच पिंपरी-चिंचवडमधून एक धक्कादायक बाब समोर आली आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

खासगी शाळांची अग्निसुरक्षा नोंदणी आणि अग्नि सुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र (फायर सर्टिफिकेट) बंधनकारक असताना पिंपरी-चिंचवड शहरातील शाळांनी अग्नि सुरक्षितता प्रमाणपत्र काढण्यास टाळाटाळ केल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे महापालिकेच्या अग्निशमन विभागाने ६५० शाळांना ई-मेलद्वारे नोटीस पाठविली आहे. संबंधित शैक्षणिक संस्थांनी अग्नि सुरक्षेचे सर्व उपाययोजना कराव्यात. याबाबत पालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करून अधिकृत फायर सर्टिफिकेट घ्यावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात ५४० खासगी तर ११० महापालिकेच्या अशा ६५० शाळा आहेत. ऊन्हाळ्याची सुटी संपून सोमवारपासून शाळा सुरू झाल्या आहेत. या शाळांमध्ये विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी अग्निसुरक्षा उपाय असणे गरजेचे आहे. महापालिकेच्या नियमानुसार प्रत्येक शैक्षणिक संस्थेस अग्निशमन विभागाकडील "शाळा व्यवसाय अग्नि सुरक्षितता पुर्तता प्रमाणपत्र" घेणे बंधनकारक आहे. यासाठी सर्व शाळांना अग्निशामक सुरक्षा प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी ई-मेलद्वारे पत्र पाठविण्यात आले आहे. सर्व शाळांमध्ये आग प्रतिबंधक उपाय योजना करणे, त्या कार्यान्वीत ठेवणे संस्था चालकांची जबाबदारी आहे. तसेच लायसन्स प्राप्त एजन्सीकडील विहित नमुन्यातील प्रमाणपत्र महापालिका अग्निशमन कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. सर्व संस्थांनी निर्धारित नियमांचे पालन करावे. आपला व्यावसायिक वापर असलेला परिसर अग्नि सुरक्षित करणे व ठेवणे ही संबंधित संस्थाचालक व मालक यांची जबाबदारी आहे.

शैक्षणिक इमारतीमधील दुर्घटनांचे वाढते प्रमाण विचारात घेता, शाळा इमारतीतील अग्निशमन यंत्रणा कार्यान्वीत आहे किंवा कसे? याबाबत शासन मान्य एजन्सीकडून अग्नि परिक्षण (फायर ऑडीट) करुन घ्यावे. फायर ऑडीटमध्ये काही आक्षेप निघाल्यास त्याची त्वरित पुर्तता करावी. अग्नि परिक्षणाचा अहवाल पालिकेला सादर करावा. शैक्षणिक संस्थेची नोंदणी व आवश्यक अग्नि सुरक्षितता उपाययोजना केल्यास गंभीर दुर्घटना टाळण्यास मोठी मदत होणार आहे. त्यामुळे अग्निशमन विभागाकडील "व्यवसाय अग्नि सुरक्षितता पुर्तता प्रमाणपत्रासाठी HTTPS://NONCOREERP.PCMCINDIA.GOV.IN/LOGIN संकेस्थळावर ऑनलाइन पध्दतीने दहा दिवसांच्या आत अर्ज करावा. तसेच अग्नि परिक्षणाबाबत मार्गदर्शन आवश्यक असल्यास अग्निशमन विभागाशी संपर्क साधवा, असे आवाहनही केले आहे.

'शहरातील शाळांनी अग्निसुरक्षा पूर्तता प्रमाणपत्र घेतले आहे का, याची पडताळणी केली जात आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये दररोज शेकडो विद्यार्थी उपस्थित असतात. त्यांच्या सुरक्षेची हमी देणे ही शैक्षणिक संस्था चालक व मालकांची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळेच नोंदणी आणि अधिकृत फायर सर्टिफिकेट प्रत्येक शैक्षणिक संस्थेने घेणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशीसाठी शाळा चालकांनी नियमांचे पालन करावे. कोणत्याही संभाव्य दुर्घटनेपासून विद्यार्थ्यांचे संरक्षण करणे हे महापालिकेचे ध्येय असल्याचे' अग्निशमन विभागाचे उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांनी सांगितले.

# भीमाशंकर मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी खुले; ऑनलाइन पासनंतरच दर्शन

## दररोज 1,000 भाविकांना प्रवेश; 30 जूनपर्यंत सकाळी 7 ते 11 दर्शनाची सुविधा



**पिंपरी | प्रतिनिधी**

भीमाशंकर मंदिर आजपासून दर्शनासाठी सुरु झाले असून मंदिरात प्रतिदिन एक हजार भाविकांना प्रवेश देण्यात येणार आहे. भाविकांनी दर्शनासाठी मंदिर व्यवस्थापन समितीच्या HTTPS://SHREEBHIMASHANKAR.COM या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर पास उपलब्ध होणार आहे. नोंदणीकृत भाविकांची यादी संकेतस्थळावर होणार असून दर्शनाकरिता पास अनिवार्य करण्यात आल्याचे माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

भाविकांना ३० जून २०२६ पर्यंत दररोज सकाळी ७ ते ११ वा. दर्शन सुविधा उपलब्ध असणार आहे. ऑनलाईन नोंदणी केलेल्या भाविकांनी दर्शनासाठी येताना वैध ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य करण्यात आले आहे. भाविक तसेच स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासन यांना सहकार्य करावे.

सन 2027 मधील नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, प्रयागराज महाकुंभ 2025 च्या अनुभवाच्या आधारे नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या भाविकांपैकी मोठ्या संख्येने भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भेट देण्याची शक्यता आहे. संभाव्य वाढत्या गर्दीच्या अनुषंगाने भाविकांसाठी आवश्यक सुविधा उभारणीची कामे सध्या प्रगतीपथावर आहेत.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भीमाशंकर येथे नवीन सभामंडप व पायरी मागचि काम सुरु असल्याने, देवस्थान ट्रस्टने ९ जानेवारी २०२६ पासून मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. सदर बंद कालावधीस ३१ मे २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मुख्य मंदिरासमोरील सभामंडपाचे काम पूर्ण करण्यासाठी सामान्य परिस्थितीत सुमारे एक वर्षाचा कालावधी अपेक्षित होता. तथापि, भिमाशंकर संस्थान, स्थानिक ग्रामस्थ आणि भाविक यांच्या सहकार्यामुळे तसेच रात्रंदिवस अखंड काम सुरु ठेवण्यात आल्याने हे काम केवळ पाच महिन्यांत पूर्णत्वास येत आहे.

मुख्य सभामंडपाचे काम पूर्ण करण्यात आले असून दर्शनबारी उभारणी, परिसर स्वच्छता, भाविकांसाठी सुविधा व गर्दी व्यवस्थापनासाठी आवश्यक पायाभूत कामे पूर्ण झाली आहे. सर्व कामे अंतिम टप्प्यात असून उर्वरित किरकोळ कामे जलदगतीने पूर्ण करुन बांधकाम साहित्य, दगड व यंत्रसामग्री हटवून परिसर भाविकांसाठी मोकळा करण्याच्यादृष्टीने श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान ट्रस्ट यांनी आजपासून दर्शनाकरिता खुले करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने देण्यात आली आहे.

# पिंपरी-चिंचवडच्या विकासाचा 'रोडमॅप' ठरणार..!

## प्रारूप विकास आराखडा 'नियोजन समिती'वर स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची निवड

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या आगामी २० वर्षांतील विकासाची दिशा आणि चेहरामोहरा ठरवणाऱ्या अत्यंत महत्त्वपूर्ण प्रारूप विकास आराखडा 'नियोजन समिती"वर महापालिकेचे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. चिंचवड विधानसभेचे आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली ही जबाबदारी सोपवण्यात आली असून, यामुळे शहराच्या नियोजन प्रक्रियेत सिव्हील इंजिनियर आणि दांडगा प्रशासकीय अनुभव असलेल्या नेतृत्वाला संधी मिळाली आहे, त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा फायदा शहर विकासाला होणार आहे.

अभिषेक बारणे सध्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती म्हणून यशस्वीरीत्या जबाबदारी सांभाळत आहेत. महापालिकेचा मुख्य आर्थिक कणा असलेल्या स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांना शहराच्या अर्थसंकल्पीय तरतुदी आणि विविध विकासकामांच्या अंमलबजावणीचा थेट अनुभव आहे. ९ हजार कोटींहून अधिक रकमेचा अर्थसंकल्प हाताळण्याचा त्यांचा हा अनुभव आता शहराच्या भौतिक आणि धोरणात्मक नियोजनात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विशेषतः विकास आराखड्यातील प्रकल्पांसाठी निधीची तरतूद करणे यामुळे अधिक सुलभ होणार आहे.



### आमदार शंकरभाऊ जगताप यांचे नेतृत्व आणि 'व्हिजन'..

**» शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आमदार शंकरभाऊ जगताप यांनी नेहमीच सूक्ष्म नियोजनावर भर दिला आहे. पिंपरी-चिंचवडमधील वाढती लोकसंख्या, वाहतुकीचे जटील प्रश्न आणि विस्तारणाऱ्या नागरी सीमा लक्षात घेऊन त्यांनी शहरासाठी 'व्हिजन २०४१' समोर ठेवले आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली अभिषेक बारणे यांची या समितीवर वर्णी लागल्याने, प्रशासकीय नियोजनाला आता प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची जोड मिळणार आहे.**

**नव्या आराखड्याचे प्रमुख पैलू..**

पिंपरी-चिंचवडचा १९९७ चा विकास आराखडा आता जुना झाला असून, नवीन आराखडा हा शहराच्या भविष्यासाठी मैलाचा दगड ठरेल. या समितीच्या माध्यमातून खालील ५ मुख्य संकल्पांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे:

वाहतूक क्रांती: मेट्रो मार्गांचा विस्तार करणे, अंतर्गत रिंग रोडचे अडथळे दूर करणे आणि 'मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब' विकसित करून वाहतूक कोंडी मुक्त शहर करणे.

शाश्वत पर्यावरण: पवना, मुळा आणि इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांना (RIVERFRONT DEVELOPMENT) गती देऊन शहराचे पर्यावरण रक्षण करणे.

आधुनिक सुविधा: वाढत्या शहरीकरणासाठी आवश्यक जागतिक दर्जाची उद्याने आणि अत्याधुनिक क्रीडांगणांचे नियोजन करणे.

शिक्षण व आरोग्य: लोकसंख्यावाढीचा वेग लक्षात घेऊन नवीन शाळा आणि अद्ययावत रुग्णालयांसाठी जमिनींची आरक्षणे सुनिश्चित करणे.

स्मार्ट शाश्वतता: २०४१ पर्यंतच्या लोकसंख्येचा विचार करून तंत्रज्ञानावर आधारित 'स्मार्ट' नागरी सुविधांची निर्मिती करणे.

### लोकसहभागातून आदर्श आराखडा..

**» प्रारूप विकास आराखडा 'नियोजन समिती' हा केवळ शासकीय दस्तावेज न राहता तो थेट जनतेच्या हिताचा असावा, यासाठी लोकसहभागावर विशेष भर दिला जाणार आहे. शहरातील विविध सामाजिक संस्था, तज्ज्ञ, वास्तूविशारद आणि सर्वसामान्य नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक विधायक सूचनेचा आणि हरकतीचा या समितीमध्ये आदर केला जाईल. नवीन आराखडा अंतिम करताना पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार आहे. आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वयाचा दुवा म्हणून ही समिती काम करेल. नागरिकांच्या अपेक्षा समजून घेऊनच पिंपरी-चिंचवडच्या उज्वल भविष्याचा अंतिम नकाशा तयार केला जाईल, असा विश्वास बारणे यांनी व्यक्त केला आहे.**

**"पिंपरी-चिंचवड हे देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणारे शहर आहे. आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली माझ्यावर ही मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. स्थायी समितीचा सभापती म्हणून काम करताना मला शहराच्या आर्थिक आणि नागरी गरजांची जवळून ओळख झाली आहे. आता विकास आराखडा समितीच्या माध्यमातून शहराचा पुढील २० वर्षांचा विचार करून शाश्वत आणि पारदर्शक नियोजन करण्याला माझे प्राधान्य असेल. सर्वसामान्यांच्या हिताचा आणि शहराच्या वैभवात भर घालणारा 'आदर्श' आराखडा तयार करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत."**

**- अभिषेक बारणे, सभापती – स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.**


# मावळमध्ये 73 ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची लगीनघाई; आरक्षण सोडत प्रक्रिया पूर्ण

## पावसाळ्यानंतर एकाच वेळी निवडणुका होण्याची शक्यता; 10 जुलैला अंतिम आरक्षण जाहीर

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मावळ तालुक्यातील गेल्या ३ वर्षात मुदत संपलेल्या ७३ ग्रामपंचायतींची आरक्षण सोडत प्रक्रिया नुकतीच पार पडली. यामुळे निवडणुकीची लगीनघाई सुरू झाली असून, तालुक्यातील एकूण १०३ पैकी तब्बल ७३ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा बार पावसाळ्यानंतर एकाच वेळी उडण्याची शक्यता आहे.

सन २०२४, २०२५ व २०२६ या तीन वर्षात मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींची प्रभागरचना व त्यानंतर नुकतीच आरक्षण सोडत प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पार पडली. मावळ तालुक्यात तहसीलदार विक्रम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार गणेश तळेकर यांच्या अधिपत्याखाली या ७३ ग्रामपंचायतींमध्ये १२ जून रोजी आरक्षण सोडत प्रक्रिया पार पडली.



जिल्हाधिकाऱ्यांची स्वाक्षरी झाल्यानंतर संबंधित आरक्षण सोडत प्रारूप प्रसिद्धी १९ जून रोजी होणार असून त्यानंतर २५ जूनपर्यंत सूचना व हरकती दाखल करण्यासाठी मुदत आहे. १० जुलै रोजी अंतिम आरक्षण सोडत जाहीर होणार आहे. त्यानंतर मतदार यादी कार्यक्रम होणार असून पावसाळ्यानंतरच संबंधित ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### पहिल्यांदाच होणार एकत्रित निवडणूक!

**» मावळ तालुक्यात एकूण १०३ ग्रामपंचायती असून, त्यापैकी तब्बल ७३ ग्रामपंचायतीची निवडणूक एकाच वेळी होणार आहे. यापूर्वी किमान ५० ग्रामपंचायतीची निवडणूक एकाचवळी होत असे व इतर ग्रामपंचायतीची निवडणूक त्या त्या वेळी होत असे. परंतु एकाच वेळी ७३ ग्रामपंचायतींची निवडणूक होण्याची ही पहिलीच वेळ आहे.**

# पुणेकरांनो सावधान! शहरात पाणीकपात लागू

## पुणे शहरात सम आणि विषम तारखांनुसार पाणीकपात सुरू; खडकवासला धरण साखळीत अवघा 5 टीएमसी साठा शिल्लक.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील पाणीकपात सुरू आहे. ५० टक्के शहराला सम आणि ५० टक्के शहराला विषम तारखांना होणार आहे. त्याचे वेळापत्रक याआधीच महापालिकेने जाहीर केले आहे. पाण्याची उपलब्धता कमी असल्याने नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे. खडकवासला धरण साखळीमध्ये केवळ पाच टीएमसी पाणी शिल्लक आहे.

त्यापैकी महापालिकेसाठी तीन टीएमसी पाणी शिल्लक आहे. हा पाणीसाठा प्रत्यक्ष पाणी वाटपाच्या तुलनेत खूप कमी आहे. या पार्श्वभूमीवर पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी, भामा आसखेड धरण आणि पवना धरणांतील उपलब्ध जलसाठा, पाटबंधारे विभागाकडून प्राप्त सूचना, तसेच आगामी कालावधीतील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता याबाबत महापालिकेमार्फत आढावा घेण्यात आला. त्यानंतरच एकदिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयामध्ये ज्या भागात याआधीच एक दिवसाआड पाणीपुरवठा होतो. त्यांचे वेळापत्रक जैसे थेच ठेवले आहे, तसेच काही तांत्रिक अडचणींमुळे काही भागांमध्ये पाणीपुरवठा होऊ न शकल्यास ती दूर करून, लगेच किंवा पुढील दिवशी पाणीपुरवठा बंद दिवशीदेखील त्या भागाला पाणीपुरवठा करण्यात येईल, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

नागरिकांनी विनाकारण पाण्याची साठवणूक करू नये, तसेच पाण्याचा अपव्ययही करू नये, घरगुती वापराबाबतही काटकसर करावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे. याशिवाय वॉशिंग सेंटर्स, जलतरण तलाव, बांधकामाच्या साइट्स याठिकाणचा पाण्याचा वापर बंद करण्याचे आदेश दिले आहेत.




### शहराला सम, विषम तारखांना पाणी

» पाण्याची उपलब्धता घटल्याने पुणे महापालिकेने शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला आहे. यानुसार शहरातील ५० टक्के भागांना सम तारखांना तर उर्वरित ५० टक्के भागांना विषम तारखांना पाणीपुरवठा केला जाणार आहे. याबाबतचे वेळापत्रक महापालिकेने यापूर्वीच जाहीर केले आहे. ज्या भागांमध्ये आधीपासूनच एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे, तेथील व्यवस्था कायम ठेवण्यात आली आहे.

### धरणांतील साठा चिंताजनक पातळीवर

» पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत सध्या केवळ ५ टीएमसी पाणी शिल्लक आहे. त्यापैकी महापालिकेसाठी अवघे ३ टीएमसी पाणी उपलब्ध असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पाटबंधारे विभागाच्या सूचनांनुसार आणि आगामी काळातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. उपलब्ध साठा आणि वाढती मागणी पाहता नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक असल्याचे महापालिकेने म्हटले आहे.

### अपव्यय टाळा; काही वापरांवर बंदी

» महापालिकेने नागरिकांना विनाकारण पाण्याची साठवणूक न करण्याचे आणि अपव्यय टाळण्याचे आवाहन केले आहे. घरगुती वापरातही पाणी जपून वापरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच वॉशिंग सेंटर, जलतरण तलाव आणि बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पाण्याचा वापर बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तांत्रिक अडचणींमुळे एखाद्या भागात पाणीपुरवठा होऊ न शकल्यास तो पुढील दिवशी अथवा बंदीच्या दिवशीही करण्यात येईल, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

# पुणे विद्यापीठात रंगणार शंभरावे साहित्य संमेलन

## एस. पी. आणि फर्ग्युसन कॉलेजची पाहणी केल्यानंतर स्थळ निवड समितीकडून पुणे विद्यापीठाच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात होणारे १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २८ ते ३१ जानेवारी २०२७ ला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. याविषयी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी रविवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या वेळी संमेलनाचे संयोजक आणि समर्थ युवा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, मसापच्या प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर उपस्थित होते. महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक रविवारी पुण्यात आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत संमेलनाचे स्थळ आणि तारखा याबाबत सर्व सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. यापूर्वी शनिवारी (दि. १३ जून) रोजी स्थळ निवड समितीने एस. पी. महाविद्यालय, फर्गसन महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठ परिसराची पाहणी केली होती. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर शिक्कामोर्तब करण्यात आले. संमेलनापूर्वी नांदी शंभराव्या साहित्य संमेलनाची या उपक्रमातून पुणे, मुंबई वगळता जेथे साहित्य संमेलने झाली आहेत,

अशा महाराष्ट्रातील ४८ ठिकाणांसह महाराष्ट्राच्या विविध भागांत संमेलनपूर्व ९९ साहित्यिक उपक्रमांद्वारे शंभराव्या साहित्य संमेलनाची नांदी होणार आहे. १५ ऑगस्ट ते १५ जानेवारी या कालावधीत हे साहित्यिक उपक्रम राबवले जातील, असे सोमण यांनी सांगितले. पुण्याच्या बाहेरून येणाऱ्या साहित्यिकांसाठी निवासाची सोय याठिकाणी करण्यात येणार आहे. त्यासाठी दीडशे खोल्या उपलब्ध आहेत. आता संयोजक समर्थ युवा फाउंडेशन आहे; परंतु सहसंयोजक आणि अन्य गोष्टीही अद्याप ठरायच्या असल्याचे सोमण यांनी सांगितले.

### अध्यक्ष निवडीची प्रक्रिया ऑगस्टपासून

» साहित्य संमेलनासाठी अध्यक्ष निवडीची प्रक्रिया ऑगस्टपासून सुरू होईल. सर्व संलग्न मंडळांकडून अध्यक्षपदासाठी नावे मागविण्यात येतील. त्यानंतर त्यावर निवड समिती निर्णय घेईल, असे सोमण यांनी सांगितले. कार्यक्रमाची आखणी करताना महामंडळाने घालून दिलेले नियम, प्रथा, परंपरा नक्कीच मोडणार नाही; परंतु संमेलनात वेगळेपण कसे येईल, याचा प्रयत्न केला जाईल. हे संमेलन हायटेकपेक्षा अधिक संस्कृती जपणारे असेल, असे सोमण यांनी नमूद केले.

# पुण्यात 23 गावांतील बांधकाम परवानग्या रखडल्या; विकास अडचणीत

## पीएमआरडीए आणि महापालिकेतील समन्वयाअभावी शेकडो प्रस्ताव अडकले; वाढलेल्या बांधकाम दरांचा फटका

**पुणे | प्रतिनिधी**

समाविष्ट २३ गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार महापालिकेला देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असला तरी अद्यापही बांधकाम परवानगीचे शेकडो प्रस्ताव मात्र पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडेच (पीएमआरडीए) अडकले आहेत. त्यामुळे प्रस्ताव दाखल केलेल्या विकसकांवर हेलपाटे मारण्याची वेळ आली असून, परवानगीला विलंब झाल्याने आता वाढलेल्या दरांचा फटकाही सहन करावा लागणार आहे.

महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार पीएमआरडीकडे होते. मात्र, गतवर्षी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे अधिकार महापालिकेला देण्याचे निर्देश दिल्यानंतर नगरविकास विभागाने दि. ११ फेब्रुवारीला पालिकेतील समाविष्ट गावांमधील पीएमआरडीएकडे असलेल्या विशेष नियोजन प्राधिकरणाचे अधिकार महापालिकेला देण्याची अधिसुचना काढली होती.

मात्र, पीएमआरडीएकडून महापालिकेला यासंबंधीच्या कागदपत्रांचे रेकॉर्डच उपलब्ध करून दिले नाही. परिणामी महापालिकेला त्यावर काहीच कारवाई करता येत नाही. त्यावर नगरविकास विभागानेच दि. ६ एप्रिलला ज्या नियोजन प्राधिकरणाकडे क्षेत्र आले आहेत, त्यामधील सर्व विकास परवानगीच्या प्रस्तावांना मंजुरी अथवा नामंजुरी देण्यासंबंधीची कार्यवाही तत्कालीन नियोजन प्राधिकरणाने ९० दिवसांत पूर्ण करणे बंधनकारक करण्याचे आदेश काढले.

या कालावधीत परवानगी देण्याची कार्यवाही केली नाही तर नव्याने नेमणूक झालेल्या नियोजन प्राधिकरणाकडे हे प्रस्ताव हस्तांतरित करून त्यावर कार्यवाही करावे, असे निर्देश दिले आहेत. मात्र, आता ९० दिवस लोटले तरीही पीएमआरडीएकडून महापालिकेला बांधकाम परवानगीच्या फाईल्स आणि प्रस्तावांचे रेकॉर्ड पाठविण्यात आलेले नाही. त्यामुळे शेकडोंच्या संख्येने प्रस्ताव बांधकाम मंजुरीविना अडकून पडले आहेत.



### वाढलेल्या बांधकाम दरांचा मोठा फटका

» गेल्या काही महिन्यांत बांधकाम साहित्यांच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. उद्योग क्षेत्रातील अंदाजानुसार बांधकाम खर्चात सुमारे २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. मंजुरी प्रक्रियेत अडकलेल्या प्रकल्पांना या वाढीचा थेट आर्थिक फटका बसत आहे. अनेक विकसकांना अतिरिक्त खर्चाचा भार सहन करावा लागत असून, त्याचा परिणाम घरांच्या किंमतींवरही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मंजुरी प्रक्रिया वेगाने पूर्ण करून प्रलंबित प्रस्तावांवर निर्णय घेण्याची मागणी आता अधिक जोर धरू लागली आहे.

### आदेश झाले, पण फाईल्स नाहीत

» समाविष्ट २३ गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार राज्य शासनाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) पुणे महापालिकेकडे हस्तांतरित केले. त्यासाठी ११ फेब्रुवारी रोजी अधिसूचनाही जारी करण्यात आली. मात्र, पीएमआरडीएकडील प्रलंबित प्रस्तावांची कागदपत्रे आणि रेकॉर्ड अद्याप महापालिकेकडे सुपूर्द करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे परवानगीसाठी अर्ज केलेल्या शेकडो विकसकांचे प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत अडकून पडले आहेत. अधिकार हस्तांतरणाचा निर्णय प्रत्यक्षात लागू होण्यात आलेल्या विलंबामुळे नागरिक आणि बांधकाम व्यावसायिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

### ९० दिवसांची मुदतही संपली

» नगरविकास विभागाने ६ एप्रिल रोजी आदेश काढून प्रलंबित विकास परवानगी प्रस्तावांवर ९० दिवसांच्या आत निर्णय घेणे बंधनकारक केले होते. तसे न झाल्यास प्रस्ताव नव्या नियोजन प्राधिकरणाकडे वर्ग करून त्यावर कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, ही मुदत संपूनही पीएमआरडीएकडून प्रस्तावांचे रेकॉर्ड महापालिकेला पाठविण्यात आलेले नाही. परिणामी, अनेक विकास प्रकल्प मंजुरीअभावी ठप्प आहेत. या प्रशासकीय दिरंगाईमुळे गुंतवणूक, गृहनिर्माण प्रकल्प आणि विकासकामांवर प्रतिकूल परिणाम होत असल्याची तक्रार विकसकांकडून करण्यात येत आहे.

# खडकवासला धरणसाखळीत पाणीसाठा घटला; पुण्यात पाणीटंचाईचा धोका वाढला

## एल निनो परिणाम आणि पावसाची कमतरता; चारही धरणांत मिळून केवळ 14.80 टक्के पाणीसाठा शिल्लक

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शेतीसह पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीतील चारही धरणांमधील पाणीसाठ्यात यंदा चिंताजनक घट झाली आहे. त्यातच अल निनोच्या प्रभावाने पाऊस लांबणीवर पडला आहे. परिणामी जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह पुणे शहरातील नागरिकांत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या साखळीतील खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चारही धरणांत मिळून केवळ ४.३१ टीएमसी (१४.८० टक्के) इतकाच पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा ५.२० टीएमसी (१७.८४ टक्के) इतका होता. त्यामुळे मागील वर्षाच्या तुलनेत यंदा धरण साखळीत जवळपास एक टीएमसीने कमी पाणी असल्याचे स्पष्ट झाले आहे

यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात अपेक्षित पाऊस झालेला नाही. हवामान तज्ज्ञांच्या मते, एल निनो च्या प्रभावामुळे महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता आहे. त्याचेच परिणाम धरणांच्या पाणलोट क्षेत्रात दिसून येत आहेत. परिसरात अद्याप मोठा पाऊस न झाल्याने धरणांमध्ये नवीन आवक वाढलेली नाह

पुढील काही दिवसांत मान्सून सक्रिय होऊन धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस झाल्यासच परिस्थितीत सुधारणा होण्याची शक्यता आहे. अन्यथा मागील वर्षाच्या तुलनेत कमी पाणीसाठा आणि अपुरी आवक यामुळे पुणे जिल्ह्यावर संभाव्य पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले असून धरण क्षेत्रात दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.



### दुष्काळात अतिक्रमणांचा ताण

» विशेष म्हणजे खडकवासला धरण साखळीच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर शहरीकरण, पर्यटन व्यवसाय, फार्महाऊस आणि बांधकामे वाढली आहेत. त्यातच कमी पाऊस, वाढती पाण्याची मागणी आणि एल निनोचा प्रभाव यामुळे जलसाठ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे.